# कारखान्यांत ८० टक्के साखर शिल्लक

## दक्षिण महाराष्ट्रातील चित्र; विक्री घटल्याचा परिणाम

**अभिजित डाके/ राजकुमार चौगुले**

सांगली/कोल्हापूर : साखरेला दर नसल्याने निराश झालेल्या कारखानदारांनी साखर विक्रीचा विचारच सोडून दिला आहे. सातत्याने २५०० रुपयांपेक्षा खालीच दर असल्याने कारखानदारांना साखर विक्री परवडेनाशी झाली आहे. याचाच परिणाम म्हणून दक्षिण महाराष्ट्रातील विविध कारखान्यांमध्ये सरत्या वर्षात उत्पादित झालेली सुमारे ऐंशी टक्के साखर शिल्लक आहे. या साखरेची विक्री कधी करायची याच चिंतेत कारखानदार आहेत.

कोल्हापूर विभागातील ३७ कारखान्यांनी २१३.९३ लाख टन गाळप करून २६.६८ लाख टन साखर उत्पादन केले आहे. साखर उतान्यातही कोल्हापूर विभाग अव्वल असून, या विभागाचा उतारा १२.४७ टक्के आहे.

सरत्या हंगामात उसाचे उत्पादन कमी येईल असा अंदाज होता. परंतु सुरवातीपासूनच उसाच्या टनेजमध्ये वाढ झाली. याचा परिणाम साखर उत्पादन वाढण्यावरही झाला. यामुळे बहुतांशी साखर कारखान्यांची गोदामे फुल आहेत.

### उत्तर प्रदेशच्या साखरेचा फटका

**कोल्हापूर व सांगली जिल्ह्यांत नामवंत साखर कारखाने आहेत. या साखरेचा दर्जा चांगला असल्याने दोन्ही जिल्ह्यांतील साखरेला गुजरात व राजस्थानमधून चांगली मागणी असते. यंदा मात्र समीकरणे बदलली. या दोन्ही राज्यांना उत्तर प्रदेशातून साखरेचा पुरवठा झाला. वहातुकीच्या दृष्टीने उत्तर प्रदेशातून साखर आणणे परवडणारे असल्याने दोन्ही राज्यांनी उत्तर प्रदेशातूनच साखर खरेदीला प्राधान्य दिले. परिणामी महाराष्ट्रातील साखर तशीच पडून राहिली.**

### व्यापाऱ्यांची बिचकत खरेदी

**साखरेच्या दरात घसरण होत असल्याने व्यापारी एकदम साखर खरेदी करण्यास तयार नाहीत. यामुळे ज्या वेगात आणि जास्त प्रमाणात साखर जाणे गरजेचे होते. त्या प्रमाणात साखर जात नसल्याचे चित्र आहे. गेल्या हंगामाच्या प्रारंभ ३२०० रुपये दर होता. यानंतर दररोज दरात घसरण झाली. परिणामी पुन्हा भाव खाली जातील या शक्यतेने व्यापाऱ्यांनी अगदी गरजेइतकीच साखर खरेदी केली. यामुळे साखरेचा स्टॉक हलण्यास तयार नाही, अशी स्थिती आहे.**



उसाच्या एफआरपीचे सूत्र तयार करताना साखरेचा भाव किती असावा हे निश्चित हवे. असे झाले तरच उत्पादक व साखर कारखान्यांचे सूत्र जुळू शकते. गेल्या वर्षाचा अभ्यास केल्यास साखरेच्या किमती प्रचंड घसरल्या. परंतु देय रक्कम तेवढीच राहिली. या दबावात साखर कारखाने आल्याने आता कारखान्यांची अवस्था बिकट झाली आहे.

**– आर. डी. देसाई,** कार्यकारी संचालक, दूधगंगा वेदगंगा सहकारी साखर कारखाना, बिद्री, जि. कोल्हापूर.

# उत्पादकांसाठी बेदाणा गोड

## मागील हंगामापेक्षा दरात किलोमागे ३० ते ४० रुपयांची वाढ

**सांगली (प्रतिनिधी)** : यंदाच्या बेदाणा हंगामात बेदाण्याच्या दरात टप्प्याटप्प्याने वाढ झाली आहे. गतवर्षीपेक्षा यंदा बेदण्याला प्रतिकिलो सुमारे ३० ते ४० रुपयांनी वाढ झाली आहे. सध्या बेदाण्याला प्रतिकिलो १८० ते २८० रुपये दर मिळत आहे. सातत्याने बेदाण्याच्या दरात होत असलेली वाढ यामुळे बेदाणा उत्पादक वाढत्या दरामुळे बेदाणा उत्पादक शेतकऱ्यांनी 'वेट अँड वॉच'ची भूमिका घेतली आहे.



तासगाव बाजार समितीत बेदाण्याच्या आवकीतही परिणाम झाला आहे. सध्या तासगाव बाजार समितीत सुमारे सहाशे ते नऊशे टन बेदाण्याची आवक होत आहे. बेदाण्याच्या दरात अजून २५ ते ३० रुपयांनी वाढ होण्याची शक्यता बाजार समितीच्या सुत्रांनी सांगितले. राज्यात गतवर्षी बेदाण्याचे उत्पादन १ लाख ६० हजार मेट्रिक टन इतके उत्पादन झाले. यंदा द्राक्षाला दर चांगले मिळाल्याने बेदाणा उत्पादक शेतकऱ्यांनी थेट द्राक्षाची विक्री केली. यामुळे बेदाण्याच्या उत्पादनात सुमारे ३० टक्के घट होईल असा अंदाज बेदाणा उत्पादक शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे. यामुळे बेदाण्याच्या दरात वाढ झाली असल्याचे चित्र आहे. गतमहिन्यापेक्षा चालू महिन्यात बेदाण्याला प्रति किलोस १५ ते २० रुपयांनी वाढ झाली आहे. गतवर्षीपेक्षा यंदाच्या बेदाण्याचे दर टप्प्याटप्प्याने ३० ते ४० रुपयांनी वधारले आहेत. तासगाव बाजार समितीत सोमवार, गुरुवार आणि शनिवार असे तीन दिवस बेदाण्याचे सौदे होतात. गतवर्षी बेदाण्याच्या प्रत्येक सौद्याला सरासरी १ हजार ५०० ते दोन हजार टन बेदाण्याची आवक होती. मात्र, यंदा बेदाण्याच्या दरात वाढ होत असल्याने प्रत्येक सौद्याला ६०० ते ९०० टन बेदाण्याची आवक होते आहे. बेदाण्याचे दर वाढत असल्याने बेदाणा उत्पादक शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त होते आहे.

### बेदाण्याचा साठा

जिल्ह्यातील गतवर्षी सर्वच शीतगृहे बेदाण्याचे फुल्ल भरली होती. यंदाच्या हंगामात सुमारे ६५ ते ७० टक्के बेदाणा शीतगृहात बेदाणा शेतकऱ्यांनी ठेवला होता. आजअखेर २५ ते २८ टक्केच बेदाण्याची विक्री झाली आहे. सध्या सांगली आणि तासगाव या दोन्ही ठिकाणी अंदाजे ४० ते ४२ टक्के बेदाणा शिल्लक असल्याची शक्यता माहिती शीतगृह असोशिएशनच्या सूत्रांनी व्यक्त केली आहे.

# अकोल्यात जिल्हा प्रशासन देणार शेतकऱ्यांना मिळणार विमा सुरक्षा

**अकोला (प्रतिनिधी)** : देशात राबवल्या जात असलेल्या प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने पुढाकार घेतला असून, मिशन राबवले जाणार आहे. याअंतर्गत अकोला जिल्ह्यातील तीन लाखांवर शेतकऱ्यांचा सुरक्षा विमा उतरविला जाणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी आस्तिक कुमार पांडेय यांनी पत्रकारांना दिली. ३१ मेपर्यंत युद्धपातळीवर यासाठी संपूर्ण यंत्रणा मिळून काम करणार आहे. हा उपक्रम पूर्ण झाल्यास योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणारा अकोला हा देशातील पहिला जिल्हा ठरणार आहे.

अकोला जिल्ह्यात प्रशासनाच्या नोंदीनुसार तीन लाख १६ हजार शेतकरी खातेदार आहेत. या संपूर्ण शेतकऱ्यांचा पंतप्रधान सुरक्षा विमा उतरविला जाईल. यासाठी लागणारा वार्षिक १२ रुपयांचा प्रीमियम जिल्हा प्रशासनातर्फे भरल्या जात आहे. हा प्रीमियम भरण्यासाठी प्रत्येक शेतकऱ्याच्या नावे त्याच्या बँक खात्यावर २२० रुपयांची एफडी केली जाईल. या रकमेवर वर्षभरात जे व्याज येईल त्या रकमेतून पुढे दरवर्षी विम्याचा प्रीमियम बँकेकडून आपोआप भरल्या जाईल. बँकांमध्ये एफडी व इतर कामांसाठी सुमारे साडेसात ते आठ कोटींचा खर्च जिल्हा प्रशासनातर्फे नावीन्यपूर्ण उपक्रमासाठी मिळणाऱ्या शासन निधीतून केला जाणार असल्याचे श्री. पांडेय यांनी सांगितले. ही प्रक्रिया ३१ मेच्या आत पूर्ण करण्यासाठी संपूर्ण माहिती भरलेले अर्ज तयार करण्यात येत आहे. हे अर्ज घेऊन प्रत्येक गावात एक कर्मचारी जाईल आणि संबंधित शेतकऱ्याची स्वाक्षरी घेईल. यासाठी तलाठी, ग्रामसेवक तसेच कृषी कर्मचाऱ्यांची विशेष मदत घेतली जाणार आहे. जिल्हा प्रशासनाकडे एक लाख ९२ हजार शेतकऱ्यांची माहिती गोळा झालेली असून, त्यांचे अर्ज छपाईचे काम युद्धपातळीवर केले जात आहे. २० ते २२ मे या तीन दिवसांत कर्मचारी गावागावात जाऊन स्वाक्षरी घेणार आहेत. त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याने या काळात गावात थांबून स्वाक्षरी देण्याचे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले. हा विमा उतरविल्यानंतर शेतकऱ्याचा अपघात, अपंगत्व, दुर्दैवी निधन झाल्यास त्याच्या कुटुंबाला विमा कंपनीकडून आर्थिक मदत दिली जाईल. याबाबतच्या माहितीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील नैसर्गिक आपत्ती विभागात एक स्वतंत्र कक्ष उघडला जाईल.

शेतकऱ्यांच्या विमा उघडण्यासाठी प्रशासन प्रत्येकाच्या नावे २२० रुपये फिक्स डिपॉझिट करीत आहे. ही रक्कम वर्षानुवर्षे शेतकऱ्याच्या नावे राहील. सामाजिक उत्तरदायित्व म्हणून एवढी रक्कम भरण्यासाठी सामाजिक संघटना, कार्यकर्त्यांनी शेतकऱ्यांना दत्तक घ्यावे, असे आवाहनही श्री. पांडेय यांनी केले.

योजनेत विमा उतरविलेल्या प्रत्येक शेतकऱ्याला जिल्हा प्रशासनाकडून लॅमिनेशन केलेले एक प्रमाणपत्र दिले जाईल. याशिवाय याच पत्राची दुसरी प्रत जिल्हा प्रशासनाकडे आणि एक प्रत बँकेकडे असेल.

# जळगावात केळी दरात किंचित सुधारणा

**जळगाव (प्रतिनिधी)** : रावेर, यावलमध्ये केळीची आवक वाढलेली असतानाच सध्या मुस्लिम बांधवांच्या रमजान पर्वामुळे केळीची मागणीही बऱ्यापैकी आहे. रावेरातून दिल्ली, जम्मू काश्मीरच्या व्यापाऱ्यांकडून आगाऊ नोंदणी करून सध्या खरेदी सुरू असून, दर आणखी १५ ते २० दिवस बऱ्यापैकी राहतील, असे संकेत आहेत.

सध्या दर्जेदार केळीला क्विंटलमागे १५० रुपये ऑन मिळत आहे. त्यात एकाच शेतकऱ्याची १५ ते १६ मेट्रिक टन केळी असली, तर त्यास ऑन आणखी वाढवून दिली जात आहे. दिल्ली येथील व्यापारी केळीचा साठा आपल्याकडे प्री कूलिंग चेंबर, रायपनिंग चेंबरमध्ये करून घेत असून, खरेदीही रोजची सुरू आहे. रावेरमधून सध्या रोज २०० मेट्रिक टन केळी दिल्ली, उत्तर प्रदेश, जम्मू काश्मिर व पंजाबमध्ये पाठविली जात असून, १६ किलोच्या बॉक्समध्ये केळीची पॅकिंग केली जात असल्याचे सांगण्यात आले. केळीला मागील आठवड्याच्या सुरवातीला १०५० रुपये प्रतिक्विंटलचे दर होते. ऑन फक्त निर्यातक्षम किंवा परदेशात पाठविल्या जाणाऱ्या केळीला काही कंपन्या देत होत्या. परंतु रमजान सुरू होताच दरात क्विंटलमागे ३० रुपयांनी सुधारणा झाली आहे. दिल्ली व जम्मू काश्मिरातील व्यापाऱ्यांनी केऱ्हाळे, खिर्डी, ऐनपूर, निंबोल, कुंभारखेडा, रसलपूर, मस्कावद, चिनावल, निंभोरा आदी ठिकाणच्या लहान व्यापारी व मोठ्या शेतकऱ्यांशी आगाऊ रकमा देऊन सौदे केले आहेत.

यामुळे दरात किरकोळ तेजी आली आहे. सध्या आंब्यांची आवकही वाढली आहे. अशात केळीच्या बाजारावर परिणाम होण्याची शक्यता होती, परंतु रमजान महिन्यामुळे दर टिकून राहतील. पुढील २० दिवस दर स्थिर राहतील किंवा आणखी किंचित वाढतील, अशी माहिती मिळाली आहे.

सकाळ अॅग्रोवन — आयोजित
श्री लक्ष्मी अॅग्रो सर्व्हिसेस — प्रायोजित
अॅग्रोवन संवाद

**'अॅग्रोवन' साधणार शेतकऱ्यांशी संवाद**

**कार्यक्रम वेळापत्रक**

**गुरुवार, २४ मे २०१८ रोजी**

**विषय** – खरीप पूर्व नियोजन व डाळींब व्यवस्थापन
**वक्ते – डॉ. किशोर झाडे** (विषय विषयज्ञ-केव्हीके, औरंगाबाद)
**श्री. पी. बी. आव्हाळे** (प्रकल्प संचालक-आत्मा, औरंगाबाद)
**श्री. शिवाजी घावटे** (संचालक-श्री लक्ष्मी अॅग्रो सर्व्हिसेस)
**स्थळ** – शीतल लॉन्स, करमाड, ता. जि. औरंगाबाद
**वेळ** – सकाळी ८.३० वा.

**या मार्गदर्शन मेळाव्याचा आपण व आपल्या शेतकरी मित्रांनी अवश्य लाभ घ्यावा, ही विनंती.**